# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 13 June 2024

## Time 7.10 AM to 7.20 AM

## Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक १३ जून २०२४ सकाळी ७.१० मि.**

****

- अणुऊर्जा विभागाच्या संशोधनातून कर्करुग्णांच्या उपचारासाठी ॲक्टोसाइट गोळीचा शोध, रेडिओथेरपी घेणाऱ्या कर्करुग्णांचं जीवनमान उंचावणार
- राज्य विधानपरिषदेच्या चार जागांसाठी ५५ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात
- पक्षविरोधी कारवाया प्रकरणी प्रदेश काँग्रेसच्या दोन पदाधिकाऱ्यांसह तिघे निलंबित
- खरीपाच्या पेरण्यांची सर्वत्र लगबग, बियाणे आणि खत वापरासंबंधी कृषी विभागाकडून सूचना

आणि

- टी – ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत भारताचा अमेरिकेवर सात गडी राखून विजय, अंतिम आठ मध्ये स्थान निश्चित

****

अणुऊर्जा विभागाच्या अनेक दशकांच्या संशोधनातून कर्करुग्णांच्या उपचारात देशानं मोठं यश संपादित केलं आहे. या संशोधनातून तयार झालेल्या ॲक्टोसाइट या गोळीमुळे, रेडिओथेरपी घेणाऱ्या कर्करुग्णांचं जीवनमान उंचावणार आहे. काल मुंबईत एका कार्यक्रमात ही गोळी बाजारपेठेत उपलब्ध करण्यात आली. भाभा अणु संशोधन केंद्राचे संचालक विवेक भसीन यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते. कर्करोगाच्या उपचारादरम्यान किरणोत्सारामुळे निरोगी ऊतींचं होणारं नुकसान रोखण्यासाठी ही गोळी लाभदायक ठरणार असल्याचं, भसीन यांनी सांगितलं. मुंबईचं भाभा अणु संशोधन केंद्र, नवी मुंबईचं कर्करोग संशोधन आणि शिक्षण प्रगत केंद्र, टाटा मेमोरियल हॉस्पिटल आणि बंगळुरू इथली आय डी आर एस

प्रयोगशाळा यांच्या संशोधनातून तयार झालेली ही गोळी, भारतात परवडणाऱ्या किमतीत उपलब्ध होत आहे. किमोथेरपीच्या दुष्परिणामांवरसुद्धा ही गोळी परिणामकारक आहे का, याची चाचपणी सध्या सुरू आहे. या गोळीला भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणाची मंजुरी मिळाली असून, भारतीय औषध नियामक प्राधिकरणाची मंजुरी मिळण्याची प्रतीक्षा आहे.

****

राज्य विधिमंडळाचं पावसाळी अधिवेशन येत्या २७ जून रोजी सुरु होणार आहे. या अधिवेशनाची अधिसूचना राज्यपाल रमेश बैस यांनी काल जारी केली.

****

राज्यात पणन महासंघासह इतर संस्थांनी आवश्यकतेनुसार खत साठ्याची संपूर्ण उचल करावी, तसंच त्यानंतरही आवश्यकता असल्यास कृषी विभागानं पणन महासंघाला अतिरिक्त कोटा मंजूर करावा, असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले आहेत. ते काल यासंदर्भातल्या बैठकीत बोलत होते. कृषीमंत्री धनंजय मुंडे, पणन महासंघाचे अध्यक्ष दत्तात्रय पानसरे, यांच्यासह अनेक अधिकारी या बैठकीला उपस्थित होते.

****

दरम्यान, शेतकऱ्याला केंद्रबिंदू मानून शेतकऱ्यांसाठी पणन विषयक सुविधा निर्माण कराव्यात, अशा सूचना पणन मंत्री अब्दुल सत्तार यांनी दिल्या आहेत. काल मुंबईत राज्य कृषी उत्पादन मंडळाच्या १५२ व्या संचालक मंडळाच्या सभेत ते बोलत होते. छत्रपती संभाजीनगर, सिल्लोड तसंच श्रीरामपूरसह राज्यात उभारण्यात येणाऱ्या नियोजित प्रकल्पांचं यावेळी सादरीकरण करण्यात आलं. सिल्लोड तालुक्यातलं मिरचीचं उत्पादन आणि गुणवत्ता विचारात घेऊन तिथं मिरचीसाठी सुविधा केंद्र निर्माण करावं, यासह विविध सूचनाही मंत्री सत्तार त्यांनी यावेळी केल्या.

****

राज्य विधानपरिषदेच्या मुंबई पदवीधर, कोकण विभाग पदवीधर, नाशिक विभाग शिक्षक तसंच मुंबई शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीत एकूण ५५ उमेदवार रिंगणात आहेत. यामध्ये मुंबई पदवीधर मतदारसंघात आठ, कोकण पदवीधर १३, नाशिक विभाग शिक्षक २१, तर मुंबई शिक्षक मतदारसंघात १३ उमेदवार निवडणूक लढवणार आहेत. या चार जागांपैकी तीन जागांवर महाविकास आघाडी आणि महायुती थेट लढत होणार असून, मुंबई शिक्षक मतदारसंघात चौरंगी लढत आहे.

मुंबई पदवीधर मतदारसंघात शिवसेनेचे दीपक सावंत यांनी उमेदवारी अर्ज मागे घेतला आहे. त्यामुळे या मतदारसंघात भाजपचे किरण शेलार, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अनिल परब यांच्यात लढत होईल. तर, मुंबई शिक्षक मतदारसंघात भाजपाचे शिवनाथ दराडे, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे ज. मो. अभ्यंकर, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे शिवाजीराव नलावडे आणि शिक्षक भारतीचे सुभाष मोरे अशी चौरंगी लढत होणार आहे.

नाशिक शिक्षक मतदार संघात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार संदीप गुळवे महाविकास आघाडीचे उमेदवार असतील असं काल जाहीर करण्यात आलं. या मतदार संघातून डॉ. राजेंद्र विखे, कॉंग्रेसचे दिलीप पाटील आणि भाजप इच्छुक धनराज विसपुते यांच्यासह १५ उमेदवारांनी माघार घेतली आहे. त्यामुळे आता संदीप गुळवे, शिवसेनेचे किशोर दराडे, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे महेंद्र भावसार आणि अपक्ष उमेदवार विवेक कोल्हे अशी लढत रंगण्याची शक्यता आहे.

कोकण पदवीधर मतदारसंघातून शिवसेनेचे संजय मोरे यांनी आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला, त्यामुळे या मतदारसांघात महायुतीचे निरंजन डावखरे विरुद्ध महाविकास आघाडीचे रमेश कीर यांच्यात थेट लढत होणार आहे.

****

लोकसभा निवडणुकीत पक्षविरोधी कारवाया केल्यामुळे सचिव प्रशांत गावंडे, सरचिटणीस सत्संग नारायणराव मुंडे, तसंच माजी आमदार नारायणराव श्रीमंतराव मुंडे यांना कॉंग्रेस पक्षातून सहा वर्षांसाठी निलंबित करण्यात आलं आहे. महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांच्या निर्देशाने ही कारवाई करण्यात आल्याचं, प्रदेश कॉंग्रेसचे उपाध्यक्ष नाना गावंडे यांनी सांगितलं.

****

आगामी विधानसभा निवडणुकांसाठी आपण राज्यव्यापी दौरे करणार असल्याचं राष्ट्रवादी कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी सांगितलं आहे. काल मुंबईत पत्रकार परिषदेत ते बोलत होते. लोकसभा निवडणुकीतली उणीव भरून काढून आम्ही विधानसभा निवडणुकींना सामोरं जाऊ, असं तटकरे यांनी सांगितलं.

****

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा ६४ वा दीक्षांत समारंभ आज होणार आहे. सकाळी अकरा वाजता समारंभाला सुरूवात होईल, विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळांवरुन या समारंभाचं थेट प्रसारण करण्यात येणार आहे.

****

लातूर जिल्हा परिषदेतंर्गत गट–क संवर्गातल्या रिक्त पदांची भरती करण्यासाठीची परीक्षा आजपासून १६ जूनदरम्यान होत आहे. जिल्ह्यातल्या तीन उपकेंद्रांवर ही परीक्षा होणार असून, प्रभारी अपर जिल्हादंडाधिकारी संगीता टकले यांनी या सर्व परीक्षा केंद्रांच्या शंभर मीटर परिसरात प्रतिबंधात्मक आदेश लागू केले आहेत.

****

धाराशिव जिल्ह्यात शेतकऱ्यांनी पुरेसा पाऊस झाल्याची खात्री करून खरीपाच्या पेरण्यांना सुरुवात करावी असं आवाहन जिल्हा कृषी अधिकाऱ्यांनी केलं आहे, यंदा मृगाचा पाऊस वेळेवर झाला असल्यामुळे उडीद, मूग यासारख्या पिकांनाही भरपूर वाव असल्याचं त्यांनी सांगितलं. जिल्ह्यात चालू वर्षी आतापर्यंत १२४ मिलिमीटर पाऊस झाला आहे.

****

लातूर जिल्ह्यात बोगस बियाणे तसंच बनावट खतांची विक्री होऊ नये, यासाठी कृषी विभागानं सतर्क राहून काम करावं, अशा सूचना लातूरच्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे यांनी दिल्या आहेत. त्या काल जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा बैठकीत बोलत होत्या. बोगस बियाणांवर कारवाईसाठी भरारी पथकं स्थापन करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

****

बीड जिल्ह्यात यंदाच्या खरीप हंगामात १ लाख ८० हजार मेट्रिक टन खताची गरज असून, आतापर्यंत १ लाख ५१ हजार ६६४ मेट्रिक टन खत बाजारात उपलब्ध झालं आहे. उपलब्ध खताची तालुकानिहाय, विक्रेतेनिहाय साठ्याची माहिती कृषक ॲपवर दररोज अद्ययावत केली जात आहे. शेतकऱ्यांनी या माहितीचा वापर करुन खतं खरेदी करावीत, विशिष्ट ग्रेडच्या खताचा आग्रह धरु नये, असं आवाहन कृषी विभागानं केलं आहे.

****

नांदेड जिल्ह्यात सोयाबीन उत्पादकांच्या मागणीनुसार डीएपी खताची उपलब्धता नसेल तर शेतकऱ्यांनी सिंगल सुपर फॉस्फेट तसंच युरियाचा वापर करावा, असा सल्ला कृषी विकास अधिकारी कार्यालयाकडून देण्यात आला आहे. नांदेड जिल्ह्यात यंदा साडे चार लाख हेक्टरवर सोयाबीन लागवडीची शक्यता आहे. दरम्यान,

कपाशी उत्पादकांनी पेरणी करतानाच बोंड अळी येणार नाही याची काळजी घ्यावी, असं आवाहन कृषी विभागानं केलं आहे.

****

टी – ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत भारताने अमेरिकेवर सात गडी राखून विजय मिळवत, अंतिम आठ मध्ये आपलं स्थान पक्कं केलं आहे. काल न्यूयॉर्क इथं झालेल्या सामन्यात अमेरिकेनं प्रथम फलंदाजी करत निर्धारित षटकात आठ बाद ११० धावा केल्या. अर्शदीप सिंहनं चार, हार्दिक पंड्यानं दोन, तर अक्षर पटेलनं एक गडी बाद केला. प्रत्यूत्तरादाखल भारताने सूर्यकुमार यादवच्या अर्धशतकी खेळीच्या बळावर १९व्या षटकात हे लक्ष्य साध्य केलं. चार गडी बाद करणारा अर्शदीप सिंह प्लेयर ऑफ द मॅच पुरस्काराचा मानकरी ठरला.

या स्पर्धेत सध्या वेस्ट इंडिज आणि न्यूझीलंडदरम्यान सामना सुरु आहे.

****

बीड जिल्ह्यात सामाजिक सलोखा कायम राखण्यासाठी आज बीड इथं सामाजिक सद्भावना फेरीचं आयोजन करण्यात आलं आहे. नागरिकांनी सकाळी साडे नऊ वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौकात एकत्र येत, या फेरीत सहभागी व्हावं, असं आवाहन पोलीस अधिक्षक नंदकुमार ठाकूर यांनी केलं आहे.

****

लातूर शहर महानगर पालिकेच्या आस्थापनेवरील विविध संवर्गात कार्यरत एकूण ३२ कर्मचाऱ्यांना कार्यालयांतर्गत पदोन्नती देण्यात आली. मनपा आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांच्या हस्ते त्यांना पदोन्नतीचे आदेश प्रदान करण्यात आले.

****